



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ३४९ वा ● शुक्रवार १० मे २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 349 | Date : 10/05/2024 blow Friday Page 4 Price 4


## वादळी पाऊस अन् गारपीटीचा मारा

### विदर्भासह राज्याच्या 'या' भागासाठी हवामान खात्याचा इशारा

**पुणे/प्रतिनिधी:**

आयएमडीनं जारी केलेल्या माहितीनुसार पूर्वोत्तर आसामवर चक्रिवादळसदृश्य वारे सक्रिय असून, बांगलादेशच्या पूर्वेपासून आरामच्या



उत्तरेपर्यं आणि ओडिशाच्या काही भागापर्यंतही चक्राकार वाऱ्यांची निर्मिती होताना दिसत आहे. ज्यामुळं देशाच्या पूर्वोत्तर राज्यांवर याचा थेट परिणाम होताना दिसणार आहे. इथं महाराष्ट्रावरही चक्राकार वारे सक्रिय असून कर्नाटकपर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. ज्यामुळं विदर्भापर्यंत त्याचे परिणाम दिसत असून सध्या इथं अवकाळी पावसानं हजेरी लावली आहे. सध्याच्या घडीला राज्यात पूर्वमोसमी वादळी पावसासाठी पोषक वातावरणाची निर्मिती होताना दिसत असून, मध्य महाराष्ट्रापासून विदर्भ आणि मराठवाड्यात वादळी वाऱ्यांसह पावसाची हजेरी असेल असा प्राथमिक अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, गारपीट आणि सोसाट्याचा वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. यादरम्यान ताशी ४०-५० ज्ञाहि वेगानं वारे वाहणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. तर, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका पाऊस होण्याची शक्यता आहे. कोकण किनारपट्टी भागात हवामान दमट राहील, तर उष्मा अधिक भासणार आहे. तर, मुंबई शहर आणि उपनगरात सकाळच्या वेळी आकाश अंशतः ढगाळ आणि दुपारपर्यंत मुख्यतः निरभ्र राहील असा अंदाज आहे.

## लोकसभा निवडणूक जिहाद विरुद्ध विकास!

## गृहमंत्री अमित शहा यांचा काँग्रेसवर हल्लाबोल

**हैदराबाद/दैनिक यश सिध्दि न्यूज** : यावेळची लोकसभा निवडणूक ही 'राहुल गांधी विरुद्ध नरेंद्र मोदी' अशी आहे, असे नमूद करत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ही निवडणूक 'जिहादला मत विरुद्ध विकासाला मत' अशीही आहे, असे प्रतिपादन गुरुवारी केले.

तेलंगणातील भोंगीर लोकसभा मतदारसंघातील प्रचार सभेत बोलताना शहा म्हणाले, ''लोकसभा निवडणुकीची लढत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची 'भारतीय गॅरंटी विरुद्ध राहुल गांधी यांची चिनी गॅरंटी' अशी आहे. भोंगीर या मतदारसंघात येत्या सोमवारी मतदान होणार आहे.

काँग्रेस, भारत राष्ट्र समिती (बीआरएस) आणि एमआयएम हा एक''तुष्टीकरणाचा त्रिकोण' असून हे लोक हैदराबाद मुक्ती दिनाचा समारंभ साजरा करण्यास परवानगी देणार नाहीत. हे लोक नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला (सीएए) विरोध करतात. त्यांना तेलंगणाचा राज्य कारभार शारिया आणि कुराणावर चालवायचा आहे, असा आरोप करत शहा यांनी 'इंडिया' आघाडीतील पक्षांवर हल्लाबोल केला.गेल्या १० वर्षांपासून



मोदी देशाचे नेतृत्व करीत आहेत. या काळात त्यांनी कोणतेही आरक्षण संपवलेले नाही. किंबहुना, काँग्रेसनेच एससी, एसटी आणि ओबीसींचे आरक्षण पळवून मुस्लिमांना चार टक्के आरक्षण दिले. - अमित शहा, केंद्रीय गृहमंत्री

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातून निवडणूक निसटत चालल्याने ते येत्या चार-पाच दिवसांत काहीतरी नाटक करतील, परंतु तरुणांनी अजिबात विचलित होऊ नये, असा हल्ला काँग्रेसनेते राहुल गांधी यांनी केला. दृकश्राव्य संदेशाद्वारे राहुल यांनी मोदींना लक्ष्य केले. ते म्हणाले,''मोदी पुन्हा पंतप्रधान होणार नाहीत. त्यामुळे ते काहीतरी नाटक करून विचलित करण्याचा प्रयत्न करतील, पण तुम्ही विचलित होऊ नका. बेरोजगारी हा तुमच्यापुढील सर्वांत मोठा प्रश्न आहे.''

## अदानी आणि अंबानी दोस्तीवरून लक्ष वळविण्यासाठी मोदी वेगळी चर्चा करतात : शरद पवार

**वाई/दैनिक यश सिध्दि न्यूज** : आतापर्यंत अदानी आणि अंबानी यांची नावे कोणाबरोबर जोडली होती. ते कोणाचे दोस्त आहेत अशी चर्चा सगळीकडे होत असताना त्याची चर्चा पुन्हा पुन्हा होऊ नये व त्याचा परिणाम त्यांच्या पक्षावर होऊ नये, यापासून लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी मोदीं असे बोलत असतात असे शरद पवार यांनी सातारा येथे सांगितले.



कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमासाठी पवार साताऱ्यात आले आहेत यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला अदानी आणि अंबानी यांनी काँग्रेसला पैसे दिले अशा पद्धतीची चर्चा मोदींनी केल्याबाबत पवारांना यांना विचारले असता त्यांनी सांगितले की आतापर्यंत अदानी आणि अंबानी यांचे संबंध कोणाबरोबर जोडले आहेत. ते कोणाचे दोस्त आहेत. याबद्दल कोणाची चर्चा सुरू आहे. याचा परिणाम पक्षाच्या मतदानावर होऊ नये यासाठी ते दुसऱ्या पक्षांची नावे घेऊन दुसरीकडे वळवत असल्याचे पवार म्हणाले.

पहिल्या दुसऱ्या तिसऱ्या टप्प्यातील मतदान हे मोदींना अस्वस्थ करणार आहे असं दिसतं आहे. पहिल्या दुसरा तिसरा टप्पा झाल्यानंतर मोदींनी आपली भाषा बदलली आहे. त्यांनी मुस्लिम समाजाचा उल्लेख खुल्या (ओपनली) पद्धतीने प्रथमच केला. त्यामुळे त्यांना आता धर्मांध आधाराशिवाय बदल होणार नाही अशी शंका त्यांच्या मनात येऊ लागली आहे. जसे जसे पुढे जातील तसे मोदींचे स्थान जास्तीत जास्त संकटात जात असल्याची भावना त्यांच्या पक्षाच्या सहकाऱ्यांमध्ये येत असावी असं माझं परीक्षण असल्याचे ते म्हणाले . महाराष्ट्र मध्ये यावेळी विरोधी आघाडीला ३० ते ३५ जागा मिळतील असे भाकीत त्यांनी । **पान ४ वर**

## हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रमासाठी अर्ज करावेत

**सोलापूर/प्रतिनिधी:**

केंद्र शासनाच्या भारतीय हातमाग तंत्रविज्ञान बरगढ (ओडीशा) संस्था येथील हातमाग व वस्त्र उद्योग तंत्रविज्ञान पदविका या तीन वर्षे अभ्यासक्रमासाठी १० जून २०२४ पर्यंत अर्ज स्वीकारण्यात येणार असल्याची माहिती वस्त्रोद्योग आयुक्त आयुष्यांत पंडा यांनी दिली भारतीय तंत्रज्ञान संस्था बरगढ (ओडिशा ) येथे प्रथम वर्षासाठी महाराष्ट्र राज्यातून १३ जागा, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील एका जागेसाठी प्रवेश देण्यात येणार आहे तसेच व्यंकटगिरी येते दोन जागेसाठी प्रवेश देण्यात येणार आहे. द्वितीय वर्षासाठी तीन जागा असून त्यापैकी एक जागा आर्थिक दुर्बल घटकांच्या विद्यार्थ्यांसाठी आहे. त्याअनुषंगाने इच्छुक उमेदावारांनी याबाबतचे आपले परिपूर्ण अर्ज दिनांक. १० जून २०२४ पर्यंत संबधित प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग कार्यालय यांचेकडे सादर करावेत. प्रवेश अर्जाचा नमुना व इतर अनुषंगिक माहिती वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या वेबसाईट http.www.dirtexmah.gov.in वर उपलब्ध आहे. तसेच सदर अर्जाचा नमूना सर्व प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, यांचे कार्यालयात देखील उपलब्ध आहे. असेही अविष्यांत पंडा यांनी कळविले आहे.




## औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्ह्याचं नाव छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिवच

### उच्च न्यायालयाचा राज्य सरकारला दिलासा

**मुंबई/दैनिक यश सिध्दि न्यूज**

राज्य सरकारने औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्ह्याचे नामकरण करण्याचा निर्णय घेतला होता. औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचे नामकरण



धाराशिव करण्यात आले होते. या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. मात्र राज्य सरकारचा हा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने वैध ठरविला आहे. राज्य सरकारचा हा निर्णय बेकायदेशीर नाही, असे उच्च न्यायालयाने म्हटले. राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयाला अनेक याचिकांद्वारे आव्हान देण्यात आले होते. न्यायाधीश देवेंद्र उपाध्याय आणि न्यायाधीश आरीफ एस. डॉक्टर यांच्या खंडपीठाने या सर्व याचिका आज फेटाळल्या.उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारच्या कारकिर्दीतील अखेरच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत जून २०२२ मध्ये औरंगाबादचे संभाजीनगर, उस्मानाबादचे धाराशिव आणि नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील असे नामकरण करण्याचा निर्णय झाला होता. पण ही प्रक्रिया नियमबाह्य असल्याचे कारण पुढे करीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाने नामांतराच्या निर्णयाला स्थगिती दिली. त्यानंतर पुढच्याच महिन्यात औरंगाबादचे पुन्हा । **पान ४ वर**

## दुसरे महायुध्द अनुदानधारकांनी हयातीचे दाखले सादर करावेत

**सोलापूर/प्रतिनिधी:**

जिल्ह्यातील दुसरे महायुध्द लाभार्थ्यांनी आपले हयातीचे दाखले व एक पासपोर्ट साईजचे फोटो या कार्यालयामध्ये प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दि. ३१ मे २०२४ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय सोलापूर येथे जमा करावेत असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.ज्या लाभार्थ्यांचे हयातीचे दाखले विहित तारखेस जमा होणार नाहीत त्यांचे अनुदान माहे जून २०२४ पासून बंद करण्यात येईल व हयातीचे दाखले प्राप्त झाल्यानंतर फरकासह अनुदान देण्यात येईल ,तरी जिल्ह्यातील दुसरे महायुध्दातील लाभार्थ्यांनी लवकरात लवकर आपले हयातीचे दाखले जमा कराव असे अवाहनही जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सोालापर यांनी केले आहे.

## मतदान केंद्रावर मिळालेल्या सुविधा बद्दल मतदारांकडून जिल्हा प्रशासनाचे कौतुक

**✻ जिल्ह्यातील ३ हजार ६१७ मतदान केंद्रावर मतदारांसाठी सर्व पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद त्यांनी स्वत: लक्ष घातले व अनेक मतदान केंद्रावर भेट देऊन सुविधांची पाहणी केली ✻ जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी बोरामणी येथून मतदान केंद्र परिसर स्वच्छते मोहिमेचा शुभारंभ केला होता**

**सोलापूर/प्रतिनिधी:**

नुकत्याच तिसऱ्या टप्प्यात झालेल्या ४२ सोलापूर लोकसभा व ४३ माढा लोकसभा मतदारसंघांमध्ये मतदानासाठी येणाऱ्या प्रत्येक मतदारासाठी विशेषता दिव्यांग, जेष्ठ नागरिक आजारी असलेले मतदार आणि नव युवा मतदारांसाठी जिल्हा प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणामध्ये आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करण्यात आले होते. त्यामुळे यावर्षी मतदानाच्या टक्केवारी थोडीशी वाढ झालेली दिसून आली.

**मंडपाची व्यवस्था :** जिल्ह्याचे वाढत असलेले तापमान पाहता प्रशासनाकडून प्रत्येक मतदान केंद्रावर आवश्यकतेप्रमाणे मतदारांसाठी मंडपाची व्यवस्था करण्यात आली होती. जेणेकरून मंडपाच्या सावलीमध्ये रांगेत उभे राहून वयोवृद्ध, रुग्ण आणि महिला मतदार आपला मतदानाचा हक्क बजावू शकतील.

जिल्ह्यात तीव्र पाणीटंचाई असताना देखील मतदारांना प्रशासनाकडून स्वच्छ आणि ग्लुकोज युक्त पाण्याची व्यवस्था :

सध्या जिल्ह्यात पाण्याची तीव्र टंचाई असतानाही ग्रामीण भागासह शहरातील सर्व मतदान केंद्रावर येणाऱ्या मतदारांसाठी प्रशासनाकडून स्वच्छ आणि ग्लुकोज युक्त पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. या सुविधेमुळे अनेक मतदार केंद्रावरील मतदारांनी समाधान व्यक्त केले.

महिला व लहान बालकांसाठी विशेष सहायता कक्ष :

मतदान केंद्रावर लहान बाळासहित येणाऱ्या महिला मतदारांसाठी संबंधित महिला मतदान करेपर्यंत त्यांच्या बाळासोबत खेळण्यासाठी व त्याचा सांभाळ करण्यासाठी तात्पुरते पाळणाघर उभारण्यात आले होते याची जबाबदारी आशा वर्कर व अंगणवाडी सेविका यांना देण्यात आली होती.

स्वच्छतागृहा ची खास सोय :

प्रत्येक मतदान केंद्रावर स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्यात आली होती ज्या ठिकाणी स्वच्छतागृह व्यवस्थित नसेल त्या ठिकाणी मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करण्यात आली होती. मतदान केंद्र व मतदान केंद्राचा परिसर स्वच्छ करण्याची मोहीम जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या संकल्पनेतून दिनांक एक मे ते सहा मे २०२४ या कालावधीत सर्व ३६१७ मतदान केंद्रावर अत्यंत प्रभावीपणे राबवण्यात आली होती. त्यामुळे प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी सर्व मतदान केंद्रावर स्वच्छता पाहून मतदार ही मतदानाच्या रांगेत उभा राहिला तरी त्यांना कोणताही त्रास झाला नाही. दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी मतदान केंद्रावर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्वतः हातात झाडू घेऊन मतदान केंद्र व परिसराची स्वच्छता मोहीम सुरू केली होती.

प्राथमिक आरोग्याची सुविधा :

मतदान करताना एखाद्या व्यक्तीला अचानक काही आरोग्याची समस्या उद्भवली तर त्याच्यावर ताबडतोब प्राथमिक उपचार करण्याकरता प्राथमिक उपचार किट तसेच म्बुलन्स ची व्यवस्था मतदान केंद्रावर करण्यात आली होती.

व्हील चेअर व रॅम्प ची सुविधा :

मतदान केंद्रावर येणाऱ्या दिव्यांग, वयोवृद्ध आणि रुग्ण मतदारांच्या सहायतेसाठी स्वयंसेवक आणि व्हील चेअर ची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच सर्व मतदान केंद्रावर व्हीलचेअर घेऊन जाण्यासाठी रॅम्प बनवण्यात आलेले होते. जेणेकरून त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास सहन न करता व्यवस्थितरित्या ते मतदान केंद्रात जाऊन आपला मतदानाचा हक्क उत्साहाने व आनंदाने बजावा, हा उद्देश होता व तो सफल ही झाला.

मतदारांचे नाव शोधण्यासाठी मतदार सहायता कक्ष :

मतदार यादी मध्ये नाव शोधण्यासाठी आणि मतदान कक्षामध्ये जाऊन मतदान व्यवस्थितरीत्या करता यावे याकरिता प्रशासनाकडून प्रत्येक मतदान केंद्रावर मतदार सहायता कक्ष उभारण्यात आले होते या कक्षाची जबाबदारी बूथ लेवल ऑफिसर आणि स्वयंसेवकांची होती. या कक्षाच्या माध्यमातून प्रत्येक मतदाराचे नाव शोधून देऊन त्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मदत करण्यात येत होते.

हिरकणी कक्ष : प्रत्येक मतदान केंद्रावर अनेक कक्षाची स्थापना करण्यात आली होती या कक्षामध्ये स्तनदा माता यांच्यासाठी व त्यांच्या लहान बाळासाठी सुविधा देण्यात आलेल्या होत्या.आदर्श मतदान केंद्र : प्रत्येक विधानसभा मतदारसंघात दोन याप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात २२ आदर्श मतदान केंद्र निर्माण करण्यात आलेले होते.युवा मतदान केंद्र : प्रत्येक विधानसभा मतदान केंद्रात दोन याप्रमाणे जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघात २२ युवा मतदान केंद्र निर्माण करून युवा नव मतदारांना मतदानासाठी आकर्षित करण्याचा प्रशासनाचा चांगला प्रयत्न होता.

दिव्यांग मतदान केंद्र : दिव्यांग कर्मचाऱ्यामार्फत चालवले जाणारे एक केंद्र प्रत्येक विधानसभा मतदारसंघात स्थापन करण्यात आले होते जिल्ह्यात एकूण ११ दिव्यांग मतदान केंद्र निर्माण केले होते.

मतदारांच्या मदतीसाठी स्वंयसेवक : जिल्ह्यातील ३६१७ मतदान केंद्रावर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची स्वयंसेवकाची फौज निर्माण करण्यात आली होती. हे स्वयंसेवक ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, रुग्ण मतदार यांना मतदार केंद्रापर्यंत घेऊन जाण्यासाठी मदत करत होते. महाविद्यालयीन । **पान ४ वर**

दैनिक
# यश सिद्धि न्यूज




## संपादकीय

### सहानुभूतीची लाट आहे...

शिवसेना-राष्ट्रवादीमध्ये फूट पडल्यानंतर राज्याच्या राजकारणाला वेगळे वळण मिळाले आहे. राज्यात चौथ्या व पाचव्या टप्प्याचे मतदान होणार आहे. त्यासाठी सर्वच राजकीय पक्ष जोरदार प्रचार करत आहेत. राजकीय पक्षांच्या त्रांगड्यात महाराष्ट्रातील राजकारण भरकटत असल्याचे दिसून येत आहे. भाजपच्या नेतृत्वाने ४५ प्लससाठी जोरदार तयारी चालवली आहे. त्यात त्यांना यश येईल काय याचे उत्तर निवडणुकीनंतरच मिळू शकेल. लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या, पाचव्या महत्त्वाच्या टप्प्याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. कारण भाजप व मित्र पक्षांनी महाराष्ट्रातील जास्तीत जास्त जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे. यासाठी राज्यभर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभांचा धडाका सुरु आहे. राज्यात अलीकडे तिसऱ्या टप्प्यातील मतदान झाले. मात्र, कमी झालेली टक्केवारी हा चिंतेचा विषय आहे. मुंबई, ठाणे, रायगड मिळून चौथ्या टप्प्यात ११ जागा महत्त्वाच्या आहेत. मतदानाची वेळ आली तरी उमेदवारी निश्चित झाली नव्हती. यापूर्वी कधीही महाराष्ट्राच्या राजकारणात झालेले नाही. याचे मुख्य कारण म्हणजे महायुतीमध्ये आलेले चार पक्ष. तर महाविकास आघाडीत असलेले पाच पक्ष यांची संयुक्त मोर्चेबांधणी होत नाही. महाविकास आघाडीचा एकच कार्यक्रम मोदी नको. तर महायुतीचा एकच कार्यक्रम चारसौ पार. या सगळ्या पार्श्वभूमीवर एकमेकांमध्ये चुरस लागल्याने महाराष्ट्राचे राजकारण आरोप-प्रत्यारोपाने गाजत आहे. तिसऱ्या टप्प्यातील मतदानात सिंधुदुर्ग मतदारसंघाचा समावेश होता. येथे महायुतीचे उमेदवार नारायण राणे व ठाकरे गटाचे विनायक राऊत यांच्यात कडवी झुंज पाहावयास मिळाली. राऊत हे विद्यमान खासदार आहेत. परंतु, शिवसेनेमधील फुटीनंतर नेते दुभंगले आहेत तर इकडे भाजप, शिंदे गट व राष्ट्रवादी अजित पवार हे तिन्ही पक्ष कोणत्याही परिस्थितीत कोकणातील ही जागा आपल्याकडे खेचण्यासाठी प्रचारात उतरले होते. मुंबईतील सहा लोकसभा मतदारसंघांकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. नरेंद्र मोदी यांच्यासह अमित शहा व इतर भाजप नेत्यांच्या जाहीर सभा या आठवड्यात होत आहेत. मिलिंद देवरा हे आता शिंदे गटात आले आहेत. त्यांना राज्यसभा देण्यात आली आहे. आता दक्षिण मुंबईची जबाबदारी महायुतीने देवरा यांच्यावर टाकली आहे. राज्यात उध्दव ठाकरे यांच्याबद्दल सहानुभूतीची लाट आहे.

### ती परत येतेय...स्टार प्रवाहची नवी मालिका थोडं तुझं आणि थोडं माझं मधून शिवानी सुर्वे येणार भेटीला



देवयानी मालिकेमुळे महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचलेली प्रेक्षकांची लाडकी अभिनेत्री शिवानी सुर्वे नव्या रुपात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. स्टार प्रवाहची नवी मालिका थोडं तुझं आणि थोडं माझं मधून शिवानी तब्बल ९ वर्षांनंतर स्टार प्रवाहच्या मालिकेत दिसणार आहे. थोडं तुझं आणि थोडं माझं मालिकेत ती मानसी सणस ही व्यक्तिरेखा साकारणार आहे. अतिशय हुशार, स्वाभिमानी, प्रामाणिक असलेली मानसी आपल्या वडिलांच्या शब्दाबाहेर नाही. वडिलांनी खूप कष्ट करून त्यांचं साम्राज्य उभं केलं. आपल्या मुलीनेही खूप शिकून नाव कमवावं असं त्यांना वाटतं. वडिलांचं स्वप्न मानसीला पूर्ण करायचं आहे. आपल्या कॉलेजची टॉपर गायत्री मॅडमच्या हुशारीवर मानसी खूप प्रभावित आहे. पण आपल्या समोर कुणालाही जिंकू न देणाऱ्या गायत्रीच्या स्वार्थी स्वभावाची तिला कल्पना नाही. खरी ठिणगी तेव्हा पडते जेव्हा मानसी पदवी परिक्षेत टॉप करत गायत्रीचा रेकॉर्ड मोडते. मानसीला नाती जोडून ठेवायला आवडतात. कुठलंही नातं टिकवायचं असेल तर फक्त आपल्याच बाजूने विचार करून चालत नाही. नातं परिपूर्ण होण्यासाठी थोडं तुझं आणि थोडं माझं असावं असं तिला वाटतं.

तब्बल ९ वर्षांनंतर पुन्हा एकदा मालिकेत काम करण्यासाठी अभिनेत्री शिवानी सुर्वे फारच उत्सुक आहे. 'स्टार प्रवाह कुटुंबासोबत पुन्हा एकदा जोडली जातेय याचा आनंद आहे. स्टार प्रवाहच्या मालिकांचे विषय, त्याची मांडणी मला खूपच भावते. त्यामुळेच थोडं तुझं आणि थोडं माझं मालिकेसाठी मी लगेच होकार दिला. मानसी हे पात्र मला अतिशय आवडलं. देवयानी मालिकेला प्रेक्षकांचं भरभरुन प्रेम मिळालं. हेच प्रेम आणि यश माझ्या नव्या मालिकेलाही मिळेल याची खात्री आहे.' अश्या शब्दात शिवानीने आपली भावना व्यक्त केली. तेव्हा पाहायला विसरु नका नवी मालिका थोडं तुझं आणि थोडं माझं १७ जूनपासून रात्री ९ वाजता फक्त स्टार प्रवाहवर. **स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८**

## महात्मा बसवण्णा : एक क्रांतीकारी कर्मयोगी !

महात्मा श्री बसवेश्र्वर हे बाराव्या शतकातील वीरशैव लिंगायत धर्माचे संस्थापक तथा धर्मगुरू आणि विशेष म्हणजे एक महान समाजसुधारक संत होते त्यांच्या एकंदरीत जनसामान्यांच्या प्रती असलेल्या प्रेमळ मानवतावादी संबंध आणि कणव पाहता जनता त्यांच्या विषयी आपलेपणा जपत त्यांना आदराने 'बसवण्णा' अर्थात थोरले बंधू असेही संबोधत असत.कन्नड भाषेत मोठ्या भावाला'अण्णा' असे म्हणतात.असो!

महात्मा 'बसवण्णा' हे भारतातील लिंगायत धार्मिक पंथाचे संस्थापक म्हणून ओळखले जातात. त्यांनी भेदाभेद न मानता इथल्या विषमतावादी वैदीक समाजव्यवस्थेत नीच समजले जाणारे खालच्या जातीतील लोकांना देव किंवा शिव यांच्या उच्च विचारसरणीत बदलत खूप मोठे सामाजिक परिवर्तन घडवून आणले,अखिल मानवजातीमध्ये तथागत गोतम बुद्धानंतर पहिल्यांदा समानतेचा उपदेश केला आणि जाती, पंथ आणि लिंग अशा मनु निर्मित सर्व अडथळ्यांना प्रखर विरोध आणि निषेध करत जातिव्यवस्था विरुद्ध लढा दिला. ज्याला क्रांती म्हणून संबोधले जाते.अगदी बाराव्या शतकातील विषमतावादी सामाजिक व्यवस्थेतील अशा क्रांतीकारक कार्यासाठी त्यांना 'क्रांतिकारी बसवण्णा' अशा नावाने ही ओळखले जाते.



कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्र्वर-बागेवाडी या छोट्याशा गावात अकराशे एकतीस साली वैशाख शुद्ध तृतीया, (अक्षय्य तृतीया) या दिवशी एका नागवंशी कुटुंबात बसवेश्र्वरांचा जन्म झाला. त्यांच्या वडीलांचे नाव मादिराज आणि आईचे नाव मादलांबिका होते. महात्मा बसवेश्र्वरांच्या मोठ्या भावाचे नाव देवराज तर बहिणीचे नाव 'अक्कानागम्मा' होते.आज जसे सकल ओबीसी समाज केवळ आणि केवळ उच्चवर्णीयांची अर्थात ब्राह्मणांची मर्जी सांभाळण्यासाठी ब्राह्मणी धर्मग्रंथांना प्रमाण मानून जी व्रत वैकल्ये, कर्मकांड अशा अंधश्रद्धेत गुंतुन आपला वारसा, आपली खरी ओळख विसरून, बाजूला सारून पुरता भटाळलेला आहे त्याचप्रमाणे तशा कुटुंबातच बसवण्णांचाही जन्म झालेला असूनही बसवण्णांचे बुद्धी चातुर्य शिस्त पाहून आपले वर्चस्व अबाधित राहिले पाहिजे या उद्देशाने तत्कालीन लेखकांनी लेखन स्वातंत्र्याच्या जोरावर त्यांचा जन्म एका कठोर, धार्मिक ब्राह्मण कुटुंबात झाला असे सांगितले आणि लिहूनही ठेवले आहे. संशोधनाअंती सत्य समोर आल्याशिवाय रहात नसते.परंतु यदाकदाचित पुढे जाऊन सत्य बाहेर येऊ दिले नाही तरी कुठलाही बहुजन नायक ब्राम्हणांशिवाय महान होऊच शकत नाही हे जनमानसावर बिंबवण्याची नीच प्रवृत्ती यातून उघड होते. छत्रपती शिवराय, बाबासाहेब डॉ भीमराव आंबेडकर आदींच्या यशस्वी जीवन कार्याबाबत ही असाच भ्रम निर्माण केला होता.तो भ्रम आजही अधूनमधून तापवला जातोय हे सर्वज्ञात आहे.

वयाच्या आठव्या वर्षी ज्ञान मिळविण्यासाठी बसवण्णा हे कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे गेले, त्याठिकाणी वीरशैव प्राचीन अध्ययन केंद्र होते. तेथे महात्मा बसवण्णांनी काही वर्षे वास्तव्य केले.आणि संगमाचे प्रमुख देवता संगमेश्र्वराचा अभ्यास केला. तेथे त्यांनी पुराणमतवादी ब्राह्मण विद्वानांशी संवाद साधला आणि त्यांचे अतार्किक आणि अमानवीय विचार ऐकल्यावर त्यांच्या विचारांशी असहमत होऊन त्यांनी सामाजिक आकलनाच्या अनुषंगाने आपले आध्यात्मिक आणि धार्मिक विचार विकसित केले. त्याच्या विचारांनुसार निर्गुण,निराकार असा एकच खरा आणि परिपूर्ण देव आहे यावर विश्र्वास ठेवावे आणि त्याव्यतिरिक्त, इतर कोणत्याही कपोलकल्पित खोट्या देवाच्या शोधात असलेल्या लोकांना योग्य मार्ग दाखविण्याची खरी गरज आहे यावर ते ठाम राहिले. कूडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादींचा अभ्यास केला. तत्कालीन संस्कारानुसार त्यांना 'जानिवरा' अर्थात जानवं म्हणून ओळखला जाणारा पवित्र धागाही घालण्यात आला होता. बालपणी त्यांच्यावर अनेक गुंतागुंतीचे धार्मिक संस्कारही करण्यात आले होते. त्याच्या पालकांच्या मृत्यूनंतर मात्र त्यांच्यातील मूळ नागवंशी जागा झाला आणि त्याप्रमाणे लगेचच त्यांनी उपनयन समारंभ आणि विधी नाकारले आणि असा दावा केला की ज्यांनी विधी केले त्यांच्याकडे खरी अंतर्दृष्टी नव्हती. वयाच्या सोळाव्या वर्षी बसवांनी स्वतःला जानिवरापासून आणि त्यानंतर सर्व ब्राह्मण परंपरांपासून मुक्त केले आणि त्यांनी बागेवाडी सोडली .

बसवण्णांचा विवाह त्यांच्या मामाच्या मुलीशी झाला. तेव्हा ते सोलापुर जिल्ह्यातील 'मंगळवेढा' येथे आले. तत्कालीन मंगळवेढा राज्यावर कलचुर्य राजा बिज्जल राज्य करीत होता आणि तो मामा त्यांचा प्रधानमंत्री होता. मामांच्या मृत्यू नंतर तिथे लेखापाल असलेल्या बसवण्णांना प्रधानमंत्री केले गेले. त्याच वेळी त्यांनी तथागतांच्या मूळ 'गण पद्धतीनुसार 'अनुभव मंटपा'ची स्थापना केली. त्यांनी स्थापन केलेल्या त्या अनुभव मंटपाने सामाजिक लोकशाहीचा पाया रचला. 'कायकवे कैलास' अर्थात 'कर्म हीच उपासना' या तत्त्वावर त्यांचा विश्र्वास असल्याने त्यांनी आपल्या कवनातून आवश्यक असलेले वचन लोकभाषेत अर्थात कन्नड भाषेत, साधे आणि समजण्यास सोपे करुन सांगितले.

महात्मा बसवण्णा हे स्वभावाने गूढवादी, आवडीने आदर्शवादी, व्यवसायाने राजकारणी, व्यासंगाने अक्षराचा माणूस, सहानुभूतीने मानवतावादी आणि दृढनिश्र्चयाने समाजसुधारक होते. ते बाराव्या शतकातील डोळस भक्ती पंथाचे एक अंग होते आणि विशेष म्हणजे त्यांच्या समकालीन विविध लोक पंथातील एक प्रमुख व्यक्तिमत्व होते. त्यांनी 'अल्लामा प्रभू' यांच्यासोबत त्यांच्या अनुयायांसाठी असंख्य पवित्र वचनांसह देव आणि जीवनाकडे पाहण्याचा एक नवीन मार्ग परिभाषित केला.

बसवण्णांनी 'वीरशैव' नावाची एक नवीन भक्ती चळवळ विकसित आणि प्रेरित करुन भक्ती उपासनेला महत्व प्राप्त करून दिले. त्यांचा वैचारिक दृष्टिकोन हा 'विद्रोही' असल्यामुळे. त्यांनी द्वैतवाद आणि देवाचे बाह्यकरणाला अनुसरून धार्मिक विधींवर प्रश्र्नचिन्ह उपस्थित करत ब्राह्मणांच्या नेतृत्वाखालील मंदिरातील पूजा आणि विधी नाकारले आहेत. वैयक्तिकरित्या लिंग आणि रुद्राक्षाची मणी अथवा शक्य असल्यास माळ परिधान करून कपाळावर पवित्र विभूती लावणे याला प्रोत्साहन दिले. भक्ती आणि श्रद्धा या तत्वांचे स्मरण म्हणून त्यांनी 'शिवाय नमः' आणि 'ओम नमः शिवाय' या षडाक्षरीचा मंत्र दिला. जेणेकरून लिंग, वर्ग किंवा जातीय भेदभाव न करता प्रत्येकाला शिवाच्या उपस्थितीची जाणीव होऊन थेट वैयक्तिक उपासना घडावी. - त्यांनी सांगितले की खरा देव स्वतःच एक आहे, स्वतः जन्मलेला आहे म्हणून त्याचे तत्वज्ञान स्वतःच्या शरीराला आणि आत्म्याला मंदिर मानण्याभोवती फिरते तेव्हा ते लोकांना नवीन मंदिरे बनविण्याऐवजी आपल्या स्वतःच्या मनालाच मंदिर बनवण्याचा सल्ला देतात. बसवण्णांनी प्रगल्भ ज्ञानाचा मार्ग म्हणून सतत वैयक्तिक आध्यात्मिक विकासावर भर दिला. त्यांनी सर्व आध्यात्मिक चर्चांमध्ये स्थानिक भाषेचा म्हणजे कन्नड भाषेचा वापर केला, जेणेकरून कुणालाही सहज आणि सोप्या पद्धतीने आध्यात्मिक कल्पना समजू शकतील त्याच अनुषंगाने त्यांनी स्थानिक भाषेत कविता रचल्या आणि त्यांचा 'कायक वे कैलासा' अर्थात 'कर्म हीच उपासना' आहे यासारख्या त्यांच्या शिकवणी आणि संदेश लोकांपर्यंत पोहोचवले आणि विशेष म्हणजे त्या लोकप्रिय झाल्या.

बसवण्णांच्या सामाजिक सुधारणेचा विचार केला तर असे दिसून येते की, त्यांनी बाराव्या शतकात कर्नाटकात पहिली ऐतिहासिक जाती विरोधी चळवळ सुरू केली होती, तीच वीरशैव चळवळ म्हणून प्रसिद्ध झाली .त्या चळवळीच्या माध्यमातून त्यांनी जनसामान्यांना सहज साधी शिकवण दिली. त्यात संसारी माणसाच्या जगण्याचे जीवन तत्त्वज्ञान त्यांनी मांडले. ते घरोघरी जात. शरणूशरणार्थी करत. शरण कक्कय्या, हरळय्या, चेन्नय्या, नुलीय चंदय्या, मडिवाळ माचीदेव, व घटीवाळय्या या कष्टकरी, दीनदलित, आदिवासी, अठरा आलुतेदार, बारा बलुतेदार, यांना बसवण्णा एकत्र करू लागले. त्यांना सहज साधे जीवन तत्त्वज्ञान सांगू लागली एकाच देवाची इष्टलिंगाची साधना करा. देहच देवालय आहे. एकत्र या चर्चा करा. सुसंवाद करा. स्त्रियांना समान अधिकार द्या. पंचसूतके पाहू नका. दलितांना समान संधी द्या. जातीभेद, वर्णभेद, लिंगभेद करू नका. कोंबडे-बकरे कापू नका. स्वकष्टावर जगा. भिक्षा मागून खाऊ नका. काम कष्ट करा. कायकात कैलास आहे. दासोह समाजसेवा आहे. पर्यावरण रक्षण करा. दगडधोंडे पुजू नका. पुरोहिताच्याहस्ते देवपूजा करू नका. ज्योतिष, भविष्य, वास्तुशास्त्र, पंचांग पाहू नका. यज्ञ, होम-हवन करु नका. अनुभव मंटपात बसा. प्रश्र्नोत्तरांच्या धर्तीवर संवाद करा, चर्चा करा. वचन साहित्य द्या. शुभाशुभ पाहू नका. नदी-स्नान करू नका. एकमेकांच्या पाया पडू नका. शरणूशरणार्थी म्हणा. संन्यासवादाचे उदात्तीकरण करू नका. संसारिक जीवन जगा. अस्पृश्यता पाळू नका. माणसाला माणसाप्रमाणे वागवा. पशुहत्या करू नका. मांसाहार करू नका व्यसनाधीन बनू नका. चोरी करु नका. हत्या करु नका. रागावू नका. खोटे बोलू नका. कोणाची घृणा करु नका. दया हाच धर्म आहे. सदाचाराने वागा. निती-नैतिकता आणि विवेकाने वागा. दयाच धर्माचा मूलमंत्र आहे. शरणांची थट्टा मस्करी करू नका. नवस-सायास करू नका. अंधश्रद्धा सोडून द्या.प्राणीमात्रावर दया करा.भुकेलेल्याला अन्न द्या. घोर जपतप करू नका. झोपच जप आहे. कठोर देहदंडण, इंद्रियदमन करू नका. देहाला कष्ट देऊ नका. देह कायकासाठी कष्टवा. उपवास-तापास, व्रतवैकल्ये करू नका. वेळेवर दिवस वर्ष यात भेद करू नका. प्रत्येक दिवस, वार शुभच आहे. मरण महानवमी आहे, त्याचे स्वागत करा. सुखी संसार करा, संसार सोडून हिमालयात जाऊ नका. संन्यास धारण करण्याची गरज नाही. मूर्तिपूजा सोडून द्या. अनावश्यक खर्च करू नका. काल्पनिक स्वर्ग-नरक यावर विश्र्वास ठेवू नका. सदाचार स्वर्ग आहे. अनाचार नरक आहे. देवघर गाव सोडून अन्यत्र भटकू नका. शेत पावनभूमी आहे. कष्टाची भाकरच महाप्रसाद आहे. जिवंत नागाला मारून चित्रातल्या नागाची पूजा करू नका, असे विसंगत व्यवहार सोडून द्या. निसर्ग नियमाप्रमाणे देह धर्माप्रमाणे वागा. अनावश्यक देहाला त्रास देऊ नका. चारित्र्य सांभाळा. दासोह करा. गरजेपेक्षा अधिक संपत्ती बाळगू नका. फुकटचे कोणाला काही देऊ नका. फुकटचे कोणाचे काही घेऊ नका. दानधर्मापेक्षा दासोह महत्त्वाचा आहे. शिक्षण घ्या, वचने लिहा, वाचन साहित्य वाचा. ज्ञानी व्हा, नैतिक बना, विवेकी बना, स्वतःमध्ये बदल करा. स्वत:मधील दोष दूर करा. कर्मकांड दूर करा. स्वतःची स्तुती करू नका अशी सहज साधी शिकवण बसवण्णांनी दिली. त्यावेळी सामान्य जनतेने ती आत्मसातही केली आणि आचरणात आणली.

कांचा इल्लैह यांच्या मते बसवेश्र्वरांच्या नेतृत्वाखालील या चळवळीने तात्विक प्रवचन पूर्णपणे बदलून टाकले.जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता या दोन संस्था होत्या ज्या वीरशैव चळवळीने नष्ट करण्याचा प्रयत्न केला. पितृसत्ता, जात आणि ब्राह्मण धर्म हे वर्चस्व आणि अधीनतेची एकमेकांशी जोडलेली व्यवस्था आहे हे जाणून त्यांना व्यवस्थेतून हद्दपार केले.आणि त्यांच्या जागी न्याय व्यवस्था आणली गेली. बसवण्णा यांच्या नेतृत्वाखाली लिंग आणि जातीच्या समानतेवर आधारित एक नवीन सामाजिक व्यवस्था, शब्द आणि कृती दोन्हीमध्ये प्रस्थापित होत होती.परंतु आज ती वीरशैव चळवळ अस्तित्वात असली तरी बसवण्णांच्या मूळ तत्वाचाच विसर पडल्यामुळे ती पुन्हा पूर्वीसारखी भटाळलेल्या स्थितीत वावरत आहे कटु असले तरी सत्य आहे.

चातुर्वर्ण्य ,कर्मकांड व विषमतेवर टीका करताना बसवण्णा म्हणतात, चांभार उत्तम तो दुर्वास, कश्यप लोहार, कौंडिण्य तो न्हावी, तिन्ही लोकी बरवी प्रसिद्धी ती जातीचे श्रेष्ठत्व हाची वेडाचार. केवळ गंध टिळा लावून काय उपयोग आहे, मणी गळ्यात बांधून काय उपयोग आहे जर तुमच्यात शुद्ध अंतरंग नसेल, मनाची शुद्धता नसेल तर हा सर्व देखावा आहे. लोक, ज्या गोष्टी आपल्या आचरणात येणे कठीण आहे त्याच गोष्टीच्या बाह्य अवडंबराने स्वतः शुद्ध मनाचे आहोत असा खोटा आव आणतात. जे देवाला दूध, लोणी, तूप अर्पण करतात ते अंधभक्तच असतात.

कल्याण येथील अनुभव मंटपात या कट्टरवादी चळवळीकडे आकर्षित झालेल्या विविध लोकांमधील बौद्धिक, अध्यात्मिक आणि आधिभौतिक द्वंद्ववादाचे यजमानपद भूषवले. ज्या काळात जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता अंतर्भूत होती त्या काळात बसवेश्र्वरांच्या चळवळीकडे कर्नाटकच्या इतिहासातील कट्टर जाती विरोधी चळवळींपैकी एक म्हणून पाहिले जाऊ शकते. चळवळ केवळ जातीवरच नव्हे तर लिंगावरही केंद्रित होती. बसवण्णा यांनी जातिव्यवस्था आणि अस्पृश्यतेवर जोरदार टीका केली. आपल्या जातीपासून अलिप्त राहण्यासाठी त्यांनी जातीय श्रेष्ठतेचे प्रतीक असलेला पवित्र धागा घालण्याचे टाळले.त्यांनी प्रसारित केलेल्या समतावादी तत्वांनी प्रामुख्याने अस्पृश्य समुदायांना आकर्षित केले. त्यांपैकी बरेच जण नाई, शूद्र यांसारख्या मागासलेल्या समाजातील होते ज्यांना विशेषतः ब्राह्मणांनी कर्मकांडाच्या प्रवचनापासून दूर ठेवले होते. बौद्ध धर्माप्रमाणे ही चळवळ ब्राह्मणवादाच्या विरोधात होती. बसवण्णांच्या तत्त्वज्ञानाने पुरोहित जातींच्या अधिकारावर प्रश्र्नचिन्ह उभे केले. या काळात रचलेल्या वचनांनी जात, अस्पृश्यता, ब्राह्मणवाद इत्यादींबाबत अनेक प्रश्र्न उपस्थित केले. मोठ्या संख्येने लोकांसाठी अपरिचित असलेल्या संस्कृतच्या विपरीत, वचने समजण्याजोग्या कन्नडमध्ये रचली गेली.त्या वचनांमध्ये समाजाच्या विविध पैलूंचा समावेश होता. अनेक वचनांनी जातीचा आणि अस्पृश्यतेचा तीव्र निषेध केला. वचनाच्या माध्यमातून त्यांनी विशेषत: दलित वर्गातील लोकांसाठी समानता आणि मानवी प्रतिष्ठेच्या महत्वावर भर दिला.ब्राह्मणांचा कट्टरपणा आणि ढोंगीपणा नाकारला.

त्यांच्या चळवळीचा उल्लेख वीरशैव चळवळीचा असला तरी, बसवण्णांनी वेगळी जात निर्माण करण्याचा प्रयत्न केला नाही हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. त्याऐवजी अस्पृश्यांना 'अनुभव मंटप' (आध्यात्मिक अनुभवाचे दालन.) मध्ये समाविष्ट करण्याचा मार्ग म्हणून 'लिंग दीक्षा' (लिंग अर्पण) प्रदान करण्यात आली. अनुभव मंटप हे सामाजिक चर्चा आणि पुरोगामी विचारांसाठी तयार केलेले लोकशाही व्यासपीठ अर्थात तत्कालीन संसद होते.

बसवण्णा यांनी जात आणि अस्पृश्यता यामागील मूलभूत समस्या ओळखल्या.अनुभव मंटप हा एक सामूहिक प्रयत्न होता ज्यात अक्कमहादेवी, अल्लमा प्रभू सारख्या उल्लेखनीय व्यक्ती आणि अस्पृश्य जातीतील चन्निया आणि कक्कया सारख्या संतांचा त्यात समावेश होता.बसवण्णा यांनी उचललेले एक मूलगामी पाऊल म्हणजे त्यांनी अस्पृश्य 'वर' आणि ब्राह्मण 'वधू' यांच्यात आंतरजातीय विवाह घडवून आणला. समाजसुधारणा चळवळीच्या इतिहासात बसवण्णा यांनी आयोजित केलेला आंतरजातीय विवाह ही एक उल्लेखनीय कामगिरी आहे.

चळवळीच्या विरोधातली परिस्थिती इतकी प्रतिकूल होती की त्यामुळे कल्याणच्या राज्यात राजकीय अराजकता निर्माण झाली. बसवण्णा यांच्या नेतृत्वाखालील चळवळ मुख्य प्रवाहातील सामाजिक सुधारणा चळवळीत दबली आहे. सध्या बसवण्णांचे अनुयायी स्वतःला लिंगायत असल्याचा दावा करतात मात्र बसवण्णा यांनी सुरू केलेल्या चळवळीच्या मूळ उद्देशापासून दूर जाऊन कर्मकांडात गुंतले आहेत जातविरोधी आणि ब्राह्मणविरोधी ही मुख्य कल्पना नाहीशी झाली. तरीही दक्षिण भारतातील सामाजिक सुधारणांच्या चळवळींचा तो पाया आहे. बसवण्णांची शिकवण ही सुधारणा चळवळीच्या इतिहासातील पुरोगामी विचारांपैकी एक आहे.

महात्मा बसवण्णांनी वेळोवेळी जातिव्यवस्थेशी निगडित सामाजिक नियमांकडे सक्रियपणे दुर्लक्ष करून बरेच वाद निर्माण केले, जे त्यांना रद्द करायचे होते.जेव्हां त्यांनी अस्पृश्यांना त्यांच्या निवासस्थानी जेवणाची परवानगी देऊन आणि ब्राह्मण स्त्री आणि अस्पृश्य पुरुषाच्या ऐतिहासिक विवाहाची मुहूर्तमेढ केली.त्यामुळे राजा बिज्जलाच्या दरबारातील पुराणमतवादी सदस्य चिडले. काही खऱ्या आणि काही खोट्या अशा कथा घेऊन राजाकडे गेले. सनातनी समाजातील संभाव्य उठावाच्या भीतीने बिज्जलाने नवविवाहित जोडप्याला कठोर शिक्षेचे आदेश दिले. या घटनेमुळे बसवण्णा खूप व्यथित झाले आणि त्यांनी जोडप्याच्या मृत्यूसाठी स्वतःला जबाबदार धरून अकराशे पंच्याण्णव मध्ये त्यांनी कल्याणातून कुडल संगमासाठी प्रस्थान केले आणि अकराशे शहाण्णव मध्ये ते 'शिवैक्य' झाले.

लेखन स्वातंत्र्याच्या जोरावर भारताचा आणि इथल्या महापुरुषांचा इतिहास जसा बदलला/विकृत केला गेला आहे अगदी तसेच ब्राम्हणांची महती वाढविण्यासाठी बसवण्णांचा जन्म एका कठोर, धार्मिक ब्राह्मण कुटुंबात झाला असे सांगितले जाते.परंतु वास्तवात हे असत्य आहे.इतकेच !

**विठ्ठलराव वठारे,** सचिव
अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महाराष्ट्र.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# कर्नाटक राज्यातील बीदर जवळील संतपूर शहरात भारतीय भीम सेनेचा वर्धापनदिन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव संपन्न

**बीदर : संतपूर/प्रतिनिधी :**

कर्नाटक राज्यातील बीदर जवळील संतपूर शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३३ वी जयंती आणि भारतीय भीम सेनेच्या ५६ व्या वर्धापनदिनानिमित्त ३० एप्रिल २०२४ ला विशेष विचार महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी महादेव कांबळे म्हणाले की, जयंती साजरी करणे हा आपला उद्देश तर आहेच पण आदर्श महापुरुषांचे आंदोलन चालविणे हा त्यामागील मुख्य हेतू आहे. आंदोलन चालविणे हे सुखोपभोगी अय्याशी लोकांचे काम नाही. निवडणूकीच्या काळात सुद्धा परिवर्तनवादाचा बाऊ करणारे लोक गांधींचे आंदोलन चालविताना दिसतात, ही मूल भारती समाजाची शोकांतिकाच म्हणावी लागेल.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना दि आल इंडिया नाग असोसिएशन (आईना) चे नॅशनल कौन्सिल मेंबर बी. बी. मेश्राम म्हणाले की, आपण फारच विपरीत परिस्थितीत अशा देशात जीवन जगत आहोत, ज्या देशातील बहुसंख्याक लोकांवर अल्पसंख्याक समुदायाचे लोक राज्य करीत आहेत. हे कसे काय शक्य आहे? याचे आकलन होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने विचार करता एका काळात मान्यवर कांशीराम यांनी बहुजन समाजातील आंदोलन चालविण्यासाठी तत्कालीन परिस्थितीत तिलक, तराजू और तलवार इनको मारो जूते चार, जिनकी जितनी संख्या भारी, उनकी उतनी भागीदारी. असे नारे दिले होते. त्याचप्रमाणे बी. श्यामसुंदर यांनी त्या काळात, बनिया को लुटो, बामन को काटो और गरीबों में बांटो. असा नारा दिला होता. याची जाणीव ठेवून बी. श्याम सुंदर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ७७ व्या जयंती समारंभात २९ एप्रिल १९६८ ला भारतीय भीम सेनेची स्थापना केली होती. हा इतिहास समजून घेण्याची नितांत आवश्यकता आहे. करिता बी. श्यामसुंदर यांच्या जयंती निमित्त २१ जानेवारी २०२४ ला फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल च्या माध्यमातून विशेष प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन करून हा विषय समजून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत, ज्याला प्राचार्य विठ्ठल दास प्यागे सरांनी सविस्तर मार्गदर्शन केले होते. तसेच हैदराबादी आंबेडकर बी. एस. व्यंकटराव यांच्या कार्यप्रणाली ला सुद्धा समजून घेणे आवश्यक आहे.



आजच्या कार्यक्रमातील महिलांची लक्षणीय उपस्थिती म्हणजे पुरुषांच्या दहापट बघितल्यावर क्रांतीची सुरूवात झालेली आहे, याची ग्वाही द्यायला हरकत नसावी, असे मला वाटते. कारण २० जुलै १९४२ ला नागपूर येथील परिषदेत बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, फक्त पुरुषांच्या तुलनेत महिलांचा आंदोलनात सहभाग असल्यास होणारी क्रांती अर्ध्या कालावधीत होईल. तो काळ जवळ येत आहे. आपण बहुतांश महिला कार्यक्रमात उपस्थित असल्याने मी आपणास जाणीव करून देऊ इच्छितो की, युपीएससी चे माजी चेअरमन एम. एल. शहारे यांचे वडील बाजारातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे असे छायाचित्रे विकत आणायचे ज्या प्रतिमेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिळविलेल्या सर्व म्हणजे बी. ए, एम. ए., पीएच. डी., डी एस्सी, एल एल डी, डी. लिट्, बार-अट-ला, इत्यादी पदव्या लिहिलेल्या असायच्या यासाठी की, त्यातून मुलांना प्रेरणा मिळेल अशी अपेक्षा होती. ज्या अपेक्षापूर्तीच्या अनुषंगाने पुढे जाऊन एम. एल. शहारे साहेब युपीएससीचे चेअरमन होऊ शकले. म्हणून मी तुम्हांला विनंती करतो की, आपण ही तशी कृती करावी. जेणेकरून आपले अपत्य मोक्याच्या व मा-याच्या जागा मिळवू शकतील.

एका काळात बी. श्यामसुंदर सरोजिनी नायडू यांच्या नेतृत्वाखालील स्वदेशी लीगचे महासचिव होते. जेव्हा महात्मा गांधींनी सरोजिनी नायडू यांच्या घरी बैठकीचे आयोजन केले होते. त्यावेळी हरिजन शब्दावरून शाब्दिक चकमक झाली आणि गांधी उच्च वर्णियांसाठी कार्य करीत असल्याची जाणीव झाल्याने बी. शामसुंदर यांनी स्वदेशी लीग चा त्याग केला. यातून आपण धडा घेऊन मार्गक्रमण केले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रानडे, गांधी आणि जीना या चर्चेत संदेश दिला आहे की, समाजातील संस्था, संघटना समोर अधोगतीची अशी स्थिती समाजात येईल जेव्हा जुने मार्ग, जुने विचार आणि जुन्या सवयी समाजाच्या उत्कर्षासाठी असफल ठरतील. ज्यामुळे आपले अस्तित्व संपुष्टात येईल. अशावेळी आपण नवे विचार, नवे मार्ग आणि नव्या सवयी शोधल्या पाहिजेत. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारिणी सभे पासून स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन ते प्रस्तावित रिपब्लिकन पक्षाची मांडणी केली होती. म्हणजे कालानुरूप पक्ष, संघटनात बदल केल्याचा इतिहास आपल्या समोर उपलब्ध आहे. आपण ज्या कुठल्या पक्ष, संघटनेत कार्य करीत आहात त्या समाजाच्या उत्कर्षासाठी लाभदायक ठरत नसतील तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गावर चालले पाहिजे. याचा आढावा घेतला असता समाज जीवनात सर्व क्षेत्रात नेतृत्वाची निर्वात पोकळी निर्माण झाल्याने नेतृत्वहीन समाजात नेतृत्व प्रदान करण्याची भाषा बोलणारे जेव्हा नेतृत्वहीन झालेत याची जाणीव झाल्यावर पर्यायी, वैकल्पिक व्यवस्था निर्माण व्हावी म्हणून आम्ही राष्ट्रीय स्तरावर दि आल इंडिया नाग असोसिएशन अर्थात आईना (-खछ-) ची स्थापना केली आहे. ही देशातील महान घटना आहे. ज्यात सर्व स्तरातील नाग लोकांना सामावून घेतले जाणार आहे. यामागील भूमिका आणि मर्म समजून घेतले पाहिजे, अशी मी आपण सर्वांना अपील करतो. जेणेकरून आपण सत्याचे समर्थन करावे आणि असत्याचा प्रतिकार करावे. ही माझी आपण सर्वांना नम्र विनंती आहे. परिणामी आपण आपल्या आदर्श महापुरुषांच्या आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समर्थ ठरावे. उमा चव्हाण यांनी अध्यक्षांनी व्यक्त केलेल्या सर्व अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आश्वासन दिले. याप्रसंगी गीता पाटील, प्राचार्य विठ्ठल दास प्यागे, शामसुंदर खानापूरकर, काशीनाथ गायकवाड यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधामती गुप्ता तर अशोककुमार माळगे यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# नंगपूरा-मुर्री शासकीय निवासी शाळेत मोफत प्रवेश योजना सुरू

## समाज कल्याण विभागाचे उपक्रम : मागासवर्गीयांनी घ्यावे लाभ

**गोंदिया/दैनिक यश सिध्दि न्यूज :**

नवीन शैक्षणिक सत्र २०२४-२५ वर्षासाठी अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री येथे मागासवर्गीय प्रवर्गातील मुलांसाठी मोफत प्रवेश प्रकिया सुरू करण्यात आले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय गोंदिया अंतर्गत सदर शाळा चालविल्या जात आहे. यामध्ये प्रवेश घेण्यासाठी अर्ज वितरण दि. २० एप्रिल ते १५ जून पर्यंत देण्यात येतील. गरजू, हुशार विद्यार्थ्यांनी या मोफत प्रवेश प्रकियेचा लाभ घ्यावा.



**प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे**

विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला (टी सी, मागील वर्गाचे गुणपत्रक (मार्कशिट), जातीचा दाखला (मुलीचा नसल्यास आई-वडील, भाऊ-बहिण), आधार कार्ड झेरॉक्स, पासपोर्ट फोटो (६ प्रती)

**शाळेची वैशिष्ट्ये** दरवर्षी १० वी चा १००% निकाल खडज्ञ मानांकित शाळा, परसबाग, नियमित योगा व एरोबिक्स, नियमित रात्रकालीन अभ्यास वर्ग, क्रॉसवर्ड ग्रंथालय, भाषा ग्रंथालय

**शाळांमध्ये उपलब्ध मोफत सोई-सुविधा**अध्यापनासाठी प्रशिक्षित व अनुभवी शिक्षक वर्ग, मोफत शैक्षणिक साहित्य उपलब्ध व डिजीटल क्लास रूम, ग्रंथालय, प्रयोगसाहित्यानी सुसज्ज प्रयोगशाळा, शाळेसाठी भव्य क्रिडांगणासहित क्रिडासाहित्य व ग्रीन जिम, सुसज्ज संगणक कक्ष व इंटरनेट सुविधा, विविध वाद्य साहित्याने समृद्ध संगीत कक्ष, मनोरंजन व शैक्षणिक माहितीकरीता रंगीत दुरचित्रवाणी, शालेय गणवेश, नाईट सुट व क्रिडा ट्रॅक सुट, सर्व शैक्षणिक साहित्य व पाठ्यपुस्तके, शुद्ध पिण्याचे पाणी, जेवणासाठी डायनिंग टेबल व्यवस्था, उत्कृष्ट भोजन, नाश्ता, दूध, अंडी, फळे व्यवस्था, आंथरूण-पांघरूण साहित्य उपलब्ध, आंघोळीसाठी गरम पाण्याची व्यवस्था (वॉटर हिटर), प्रशिक्षित सुरक्षारक्षक व सफाई कर्मचारी, सी. सी. टी. व्ही. सुरक्षा, सुसज्ज गणित प्रयोगशाळा इत्यादी सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

शाळेत प्रवेश घेण्यासाठी सहाय्यक आयुक्त विनोद मोहतुरे यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापक रविशंकर इढूले यांच्या नेतृत्वाखाली शाळेतील शिक्षक प्रदीप ढवळे, नीता भलमे, अस्मिता तेलंग, साधना पारधी, मुन्नाभाई नंदागवळी व तुषार महाजन यांच्याशी संपर्क साधावा आणि आपले प्रवेश करून घ्यावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांबरोबर पत्रकारांच्याही प्रश्नांबाबत आवाज उठवू : बजरंग सोनवणे

## पत्रकार संघाच्या शिष्टमंडळाचे सोनवणे यांना निवेदन

**बीड/प्रतिनिधी**

मी सर्वसामान्य शेतकरीपुत्र म्हणून निवडणूकीत उभा आहे. वृत्तपत्रांच्या मागण्याबाबत पत्रकारसंघाने मला निवेदन दिले हेच माझ्यासाठी मोलाचे असून मला जनतेच्या आशिर्वादाने संसदेत जाण्याची संधी मिळाल्यास वृत्तपत्रांच्या मागण्यांबाबत नक्कीच पाठपुरावा करेल अशी ग्वाही बीड लोकसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी दिली. पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी पत्रकार शिष्टमंडळासह सोनवणे यांची भेट घेवून केंद्र सरकारकडील वृत्तपत्रांच्या मागणीबाबत निवेदन देवून चर्चा केली.

बीड लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या पक्षाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांची पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व पदाधिकार्यांनी भेट घेवून केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणार्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजार रूपयाची सुट द्यावी या मागणीसाठी पाठींबा देवून संसदेत गेल्यास पाठपुरावा करावा असे निवेदन दिले. वृत्तपत्रांच्या समस्या समजून घेवून सोनवणे म्हणाले, मी शेतकरीपुत्र, सामान्य कुटूंबातील असून लोकसभेची निवडणूक लढवत आहे.



पत्रकार संघाने मला निवेदन देवून मागण्यांबाबत चर्चा केली हेच माझ्यासाठी समाधानाची गोष्ट आहे. पत्रकारांनी मला आपल्या मागण्यांबाबत निवेदन दिल्यामुळे मला विजय निश्चित वाटतो अशी आशा व्यक्त करून संधी मिळाल्यास वृत्तपत्रांच्या मागण्यांबाबत संसदेत प्राधान्याने भूमिका मांडेल अशी ग्वाही दिली. यावेळी पत्रकार संघाचे विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, हिंदुस्थान टाईम्सचे वरिष्ठ सहाय्यक संपादक सुरेंद्र गांगण, एबीपी माझाचे प्रतिनिधी गोविंद शेळके, टिव्ही नाईनचे प्रतिनिधी महेंद्र मुधोळकर आदि उपस्थित होते.

# गोदिंया-चांदाफोर्ट रेल्वेला मागेपुढे सहा बोगी वाढवा

## मुन्नाभाई नंदागवळी यांची मागणी : गर्दीमुळे नागरिक त्रस्त

मी नेहमी प्रवास करतो, कोरोनापासून रेल्वे कमी झाल्या त्यामुळे प्रचंड गर्दी रेल्वे मध्ये असते. पाय ठेवायलाही जागा राहत नाही एवढी गर्दी असते. दिवसेंदिवस नागरिकांची रहदारी वाढत आहे. लग्नसराई सुरू आहे. तेंदूपत्ता कामगार वर्ग ये जा करत आहे. नियमित प्रवासी तर आहेतच. अशा अनेक कारणांमुळे गर्दी अफाट वाढली आहे. म्हणून रेल्वेला बोगी वाढविणे आवश्यक आहे. **- मुन्नाभाई नंदागवळी**

**युवा सामाजिक कार्यकर्ते, येरंडी-बाराभाटी**



**मालगाड्या व सुपरफास्ट गाड्या या मार्गावरून कमी कराव्या.**

**गोंदिया ते चांदाफोर्ट मार्गावर प्रवासी रेल्वे ह्या मालगाड्या व सुपरफास्ट गाड्यामुळे वेळीअवेळी धावू लागल्या आहेत. कारण प्रवासी रेल्वेपेक्षा मालगाड्या व सुपरफास्ट यांना जास्त महत्त्व दिले जाते. हे संपूर्ण: चुकीचे आहे. ज्या उद्देशाने रेल्वे सुरू केली आहे. ते उद्देश सदर विभागाने प्रामाणिकपणे पुर्ण करावे, ही नागरिकांची आर्तहाक आहे. म्हणून या मार्गावरून मालगाड्या व सुपरफास्ट या गाड्या बंद कराव्या.**

### चांदाफोर्ट ते गोदिंया ही दुपारची रेल्वे सुरू करा.

कोरोना आधी दुपारची रेल्वे येत होती, ती बंद असल्याने फक्त एकच रेल्वे चांदाफोर्टकडून गोंदिया येते. त्यामुळे प्रचंड नागरिकांची गर्दी वाढली आहे. सारख्या गच्च भरलेली रेल्वे ये जा करत आहे. त्यामुळे कोरोना पूर्वी असलेल्या रेल्वे सुरू कराव्या अशीही नागरिकांची मागणी आहे.

### रेल्वे वेळेवर सोडावी.

रेल्वे या आता काही वर्षापासून कधीच वेळेवर आली आणि गेली पण नाही. याला कारणीभूत रेल्वे प्रशासन आहे. नियमितपणे प्रवासी रेल्वे सुरु ठेवायला पाहिजे आहे. ही सुध्दा प्रवाशांची मागणी आहे.

**बाराभाटी/दैनिक यश सिध्दि न्यूज**

अनेक वर्षापासून पिढ्यानपिढ्या गोंदिया ते चांदाफोर्ट ही रेल्वे धावत आहे. पण रेल्वे दहा वर्षात अनेक अडचणी या मार्गावर निर्माण झालेल्या आहेत. ब-याचदा रेल्वे ह्या वेळेवर कधी ये जा करत नाही. घोडा कुठे पेंड खातो हे समजत नाही. अशातच कोरोना नंतर या मार्गाच्या धावणाऱ्या रेल्वे कमी झाल्यामुळे आणखी मोठा त्रास नागरिकांना होत आहे. याबरोबरच धावत असणाऱ्या रेल्वेला एकदम कमी बोगी लावल्या जात असल्याने प्रचंड गर्दी होत आहे. याचा नागरिकांना खुप त्रास होतो. म्हणून गोदिंया-चांदाफोर्ट रेल्वेला मागेपुढे सहा बोगी वाढवा. अशी मागणी युवा सामाजिक कार्यकर्ते मुन्नाभाई नंदागवळी यांनी केली आहे. गेल्या अनेक पिढ्यांनी रेल्वेमध्ये प्रवास केला आहे. कोळसा रेल्वे पासून तर विजेच्या रेल्वे पर्यंत अनुभवल्या आहेत. गेल्या दहा वर्षामध्ये रेल्वे खाजगीकरण झाल्यामुळे नागरिकांना रेल्वेचा प्रवास कंटाळवाणा होत चालला आहे.

कारण रेल्वे पासून वाढलेल्या समस्यामूळे नागरीक त्रासले असल्याचे सांगतात.

आधीच्या काळी रेल्वे प्रवास हा आनंदाचा म्हणून लोक आनंदाने करायचे. पण रेल्वे वेळवर येणे, लाभासाठी मालगाड्या सोडणे, आवश्यक अशा रेल्वे न सोडता कोणत्याही रेल्वे पाठविणे. प्रवासी रेल्वेला कमी प्राधान्य दिले जाते. त्यामध्ये आता धावणाऱ्या रेल्वेला चक्क बोग्या कमी लावल्या जातात. परंतु याकडे नागरिकांच्या योजना मिळवून देणारे लोकप्रतिनिधी हे लक्ष घालत नाही. नागरिकांची सेवा केली जात नाही.

दररोजच्या कामाला जाणारे मजूर, रोजच्या आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी जाणारे नोकरी करणारे कर्मचारी, प्रशिक्षण करणारे प्रशिक्षणार्थी, शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेणारे विद्यार्थी ही मंडळी दररोज प्रवास करतात. यांना अतिशय त्रास सहन करावा लागत आहे. कारण रेल्वेला बोगी कमी असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

# लोकनेते स्व.सूर्यकांत बानेगाव यांना ग्रामपंचायत येथे अभिवादन



**चपळगाव/प्रतिनिधी**

चपळगावचे दिवंगत माजी सरपंच स्व,सूर्यकांत अण्णा बानेगाव यांच्या दहाव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त ग्रामपंचायत चपळगाव येथे त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले,सामाजिक कार्यकर्ते रियाज पटेल व सामाजिक कार्यकर्ते महेश गजधाने यांच्या हस्ते स्व,सूर्यकांत बानेगाव यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.याप्रसंगी सरपंच सिद्धाराम भंडारकवठे जेष्ठ नेते नंदकुमार पाटील संजय बानेगाव महादेव वाले महेश गजधाने बसवराज बानेगाव ग्रा,पं,सदस्य परमेश्वर वाले महिबूब तांबोळी श्रावण गजधाने सुरेश सुरवसे गुलाब बानेगाव कुमार दुलंगे राजकुमार कोळी मोहन दुलंगे सुभाष बुगडे भीमाशंकर दुलंगे उमेश सोनार रवी कोरे दिलीप गजधाने यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

पान १ वरुन

## अदानी आणि अंबानी दोस्तीवरून..

विद्यार्थ्यांना निवडणुकीच्या उत्सवात सहभागी करून त्यांना हा उत्सव प्रत्यक्ष पाहणे व भविष्यातील लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी त्यांच्या सहभाग घेणे असा उद्देश होता.

मोबाईल हेल्थ टीम : मतदानाच्या दिवशी मतदारांसाठी तसेच मतदान केंद्रावरील अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी आरोग्याची समस्या निर्माण झाल्यास ६० मोबाईल हेल्थ टीम आरोग्य साहित्यासह तयार ठेवण्यात आलेल्या होत्या.

✻ महिला, युवा आणि रुग्ण मतदारांच्या प्रतिक्रिया ✻

✻ महिला मतदार- महिलांसाठी खूप छान आदर्श महिला केंद्र उभारण्यात आलेले आहे या केंद्राची वेगवेगळ्या रंगाच्या फुग्यांनी केलेली सजावट प्रत्येकांना आकर्षित करत आहे. या ठिकाणी येऊन मतदान करण्याचा एक विलक्षण आनंद आम्हाला मिळाला आहे. उत्कृष्ट नियोजन,परिपूर्ण व्यवस्था, मंडप, पिण्याचे पाणी आदी सुविधा आमच्यासाठी उपलब्ध केल्याबद्दल शासनाचे खूप खूप आभार.

✻ युवा नव मतदार : मतदान केंद्रावर मतदानासाठी महिलांना प्रथम प्राधान्य दिले.उन्हाचा जास्त त्रास होऊ नये याकरता वयोवृद्ध मतदारांसाठी व्हीलचेअर ची सुविधा देत होत. आणि सर्व अधिकारी आणि कर्मचारी नम्रपणे सहकार्य करत होते.आमच्यासारख्या नव युवा मतदारांसाठी हा एक वेगळा आणि आठवणीत राहणारा प्रसंग होता.

✻ रुग्ण मतदार : माझ्यासारख्या रुग्ण मतदारांसाठी व्हीलचेअर आणि स्वयंसेवकाची खूप खूप छान व्यवस्था करण्यात आली होती. केंद्रावरील पोलीस सुरक्षा, ग्लुकोजचे पाणी मंडपाची व्यवस्था एकदम चोख होती.अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

✻ दत्तात्रय राठोड (लमाण तांडा बालाजी नगर)

नागरिकांसाठी मतदान केंद्रावर मंडपाची व्यवस्था, फिल्टर व ग्लूकोज युक्त पाणी आणि रेड कार्पेट यांसारख्या अनेक सुविधा दिलेल्या आहेत. मी प्रत्येकांना आवाहन करतो की त्यांनी मतदान करण्यासाठी मतदान केंद्रावर यावे.

कडक असाह्य असलेल्या उन्हात मतदान करण्यासाठी येणाऱ्या मतदारांसाठी जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद त्यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, अतिरिक्त निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी व अन्य प्रशासकीय यंत्रणा कडून निवडणूक प्रक्रिया यशस्वी होणे व मतदान केंद्रावर चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी काटेकोरपणे नियोजन केले होते. प्रशासनाच्या या नियोजनामुळे अनेक मतदारांना मतदान करताना या सुविधांचा लाभ घेता आला त्यामुळे मतदारांकडून प्रशासनाच्या या कामाचे सर्व स्तरावरून कौतुक केले जात आहे.

## अदानी आणि अंबानी दोस्तीवरून ..

केले. मागील वेळी विरोधकांना सहा जागा मिळाल्या होत्या. मात्र यावेळी लोकांना बदल हवा आहे. त्यामुळे काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीला आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला लोकांचे समर्थन मिळत आहे असं एक महाराष्ट्राचे चित्र आहे. राज ठाकरे आणि आणि पंतप्रधान मोदी मुंबईमध्ये एकत्र येत आहेत याचा अर्थ मोदींचा आत्मविश्र्वास डळमळीत व्हायला लागला आहे. त्यामुळे त्यांना मुंबईमध्ये नेहमी कोणाची ना कोणाची तरी मदत घ्यावीच लागते आणि त्यासाठी ते दोघे एकत्र आले आहेत. त्याचा परिणाम काय होतोय हे लवकरच दिसून येईल.

जे पक्ष काँग्रेस च्या नेहरू गांधींच्या विचाराचे आहेत व अनेक वर्ष त्यांनी एकत्र त्या विचाराने काम केलं आहे ते पक्ष एकत्र येतील असे मी म्हणालो आहे. याचा अर्थ राष्ट्रवादी काँग्रेस विलीन होईल असं नाही आणि शिवसेनेचे स्वतंत्र अस्तित्व आहे ते फक्त या निवडणुकीमध्ये आम्हाला मदत करत आहेत. त्यामुळे त्यांचश पक्ष विलीन होईल असं मी कधी म्हणालो नाही.

गुजरातसह भाजपची सत्ता असणाऱ्या अनेक राज्यांमध्ये मतदान केंद्र बळकवण्याची प्रवृत्ती वाढत आहे. पक्षामध्ये तुम्ही स्वतः निर्णय घेता आणि पक्षाने निर्णय घेतला असल्याचे असल्याबाबत अजित पवार महाराजांचे विचारले असता ते म्हणाले आता ते स्वतःचा पक्ष चालवत आहेत ना मग त्यांनाच विचारा पक्ष कसा चालवतात ते असे ते म्हणाले. मी पक्षात ज्येष्ठ असतो तरी या वयात मला कोणीही पळापळ करायला सांगत नाही सगळे माझी काळजी घेतात असे त्यांनी अजित पवारांच्या काळजीवर मत व्यक्त केले.

सुप्रिया सुळे पुण्यात आल्यानंतर कार्यकर्त्यांनी पेढे वाटून फटाक्याची आतष बाजी करत जल्लोष केला. व त्या निवडणुकीत विजयी होणार असल्याच्या घोषणा दिल्या. याबाबत ते म्हणाले कार्यकर्त्यांना त्याची खात्री वाटत असेल म्हणून त्यांनी आनंद व्यक्त केला असेल.

# मंगळवेढ्यातील गोणेवाडीचे आदर्श दिव्यांग मतदान केंद्र ठरले आकर्षणाचे केंद्रबिंदू



**सोलापूर/प्रतिनिधी:**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी यंदा पहिल्यांदाच निवडणूक विभागाच्यावतीने सखी मतदान केंद्र, आदर्श दिव्यांग मतदान केंद्र, आदर्श महिला मतदान केंद्र, आदर्श युवा मतदान केंद्र याचबरोबर आदर्श मतदान केंद्र ही संकल्पना राबविल्यामुळे मतदार आकर्षित होऊन मतदानाचा हक्क बजाविला आहे. ४२ सोलापूर लोकसभा मतदार संघातील पंढरपूर विधानसभा मतदारसंघात मंगळवेढा तालुक्यातील गोणेवाडी येथील दिव्यांग मतदारांसाठी स्थापन केलेले आदर्श दिव्यांग मतदान केंद्र हे आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले आहे. मंगळवेढा तालुक्यातील गोणेवाडी येथील आदर्श दिव्यांग मतदान केंद्राची स्थापना केली. या मतदान केंद्रात रॅम्प, व्हीलचेअर, प्रथमोपचार पेटी, मदत कक्ष, कमोडसह स्वतंत्र प्रसाधनगृह, हिरकणी कक्ष, उष्मघातापासून वाचण्यासाठी सूचना फलक, आरोग्य सुविधा,पुरेशी प्रकाश व्यवथा, पिण्याच्या पाण्याची सुविधा, महिला दिव्यांग मतदारांच्या मदतीसाठी महिला स्वयंसेवक, कुलर आधी आवश्यक सुविधा देण्यात आल्या. जिल्ह्यातील सर्व मतदार संघात दिव्यांग कर्मचारी व्यवस्थापित मतदान केंद्राची स्थापना करण्यात आली होती. या मतदान केंद्रात त संपूर्ण व्यवस्थापन दिव्यांग कर्मचा-यांनी केले होते. जिल्ह्यात सोलापूर-४२ (अ.जा.) व माढा-४३ लोकसभा मतदार संघासाठी शुक्रवार दिनांक- ०७ मे २०२४ रोजी मतदान पार पडले.जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी कुमार आर्शीवाद यांच्या मार्गदर्शनखाली जिल्ह्यातील सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, अतिरिक्त सहा. निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी तसेच अन्य प्रशासकीय यंत्रणेने मतदारांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी अथक परिश्रम घेतले.

## औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्ह्याचें

नामांतर करण्यात आले. यावेळी संभाजीनगर नावापुढे छत्रपती असे नामविशेष जोडून छत्रपती संभाजीनगर, असे नामकरण करण्यात आले.

औरंगाबाद शहराचे संभाजीनगर असे नामांतर करण्याचा निर्णय शिवसेना-भाजप युती सरकारच्या काळात १९९७ मध्ये झाला होता. सारी प्रक्रिया पूर्ण करून अधिसूचना जारी करण्यात आली होती. पण राज्य सरकारच्या त्या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्यात आले. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले होते. राज्यात १९९९ मध्ये सत्ताबदल झाल्यावर औरंगाबादच्या नामांतराची अधिसूचना तत्कालीन विलासराव देशमुख सरकारने मागे घेतली होती. परिणामी गेली २५ वर्षे निर्णय होऊनही प्रत्यक्ष संभाजीनगर असे नामकरण झाले नव्हते.

शहरांच्या किंवा जिल्ह्यांच्या नामकरणानंतर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये नामकरणाचा ठराव सरकारला मांडावा लागतो. त्यावर चर्चा होऊन नामकरणाचा ठराव साध्या बहुमताने मंजूर करावा लागतो. राज्य विधिमंडळाने नामकरणाचा ठराव संमत केल्यावर हा ठराव केंद्रीय गृहमंत्रालयाकडे सादर केला जातो. गृहमंत्रालय रेल्वे, टपाल विभाग, सव्हे ऑफ इंडिया अशा विविध यंत्रणांकडून ना हरकत घेतली जाते. साऱ्या यंत्रणांनी प्रतिसाद दिल्यानंतर गृहमंत्रालय नामकरणासाठी राज्य सरकारला मान्यता देते. त्यानंतर राज्य सरकार शहराच्या नामकरणाची अधिसूचना जारी करते.

# स्वेरीत 'प्रॉब्लेम सॉल्विंग थ्रू प्रोग्रामिंग इन सी' या विषयावर कार्यशाळा संपन्न

**पंढरपूर/प्रतिनिधी**

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागाच्या वतीने 'प्रॉब्लेम सॉल्विंग थ्रू प्रोग्रामिंग इन सी' या विषयावर १० दिवशीय कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली. यामध्ये विद्यार्थ्यांना संगणक क्षेत्रात काम करत असताना येणाऱ्या अडचणी आणि त्या कशा दूर करायच्या याबाबत महत्वपूर्ण माहिती देण्यात आली. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली दि.१५ ते दि.२५ एप्रिल, २०२४ या कालावधीत आयोजिलेल्या कार्यशाळेत पुण्यातील सॉफ्टटेक सोल्युशन्स ट्रेनिंगचे आर. एस. स्वामी हे प्रमुख मार्गदर्शन करत होते. प्रमुख पाहुणे स्वामी म्हणाले की, 'कॉम्प्युटरची सी ही भाषा अत्यावश्यक असून ती प्रक्रियात्मक आणि सामान्य हेतू स्वरूपाची आहे. १९७२ मध्ये शास्त्रज्ञ डेनिस रिची यांनी बेल टेलिफोन येथे युनिक्स ओएस विकसित करण्यासाठी सी भाषा विकसित केली होती. आत्तापर्यंत 'सी भाषा' ही 'जावा' सोबत सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या संगणकीय भाषांपैकी एक असून जी बहुतेक आधुनिक प्रोग्राममध्ये वापरली जाते. 'सी भाषा' वापरण्यासाठी काही अटी आवश्यक आहेत. ही भाषा समजून घेण्यासाठी आणि शिकण्यासाठी संगणक प्रोग्रामिंग शब्दावलीची मूलभूत माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही कॉम्प्युटर प्रोग्रॅमिंग भाषेची मूलभूत माहिती समजल्यास 'सी भाषा' प्रभावीपणे समजून येईल. यामध्ये कंट्रोल स्टेटमेंट (निर्णय घेणे) त्याचे प्रकार, प्रोग्राम नेस्टेड इफ एलसे स्टेटमेंट, स्विच स्टेटमेंट, लूप फॉर लूप आणि इ.व्हाइल लूप करणे, स्वॅप नंबर, वितर्क प्रकारासह कोणतेही रिटर्न नसलेले फंक्शन, अल्गोरिदम,



वर्गीकरण तंत्र निराकरण केलेल्या समस्या, विधानांसह निवड क्रमवारी, निवड क्रमवारी प्रोग्राम तसेच इन्सर्शन सॉर्ट, मर्ज सॉर्ट आणि हीप सॉर्ट सोडवलेल्या समस्या स्टेटमेंटसह बबल सॉर्ट, क्विक सॉर्ट, रॅडिक्स सॉर्ट हीप सॉर्ट सॉल्व्ह केलेल्या समस्या स्टेटमेंट याबाबत माहिती सांगितली. बेसिक टर्मिनॉलॉजीज आणि रिप्रेझेंटेशन्स, बेसिक ट्री टर्मिनोलॉजीज, विविध प्रकारचे ट्री: बायनरी ट्री, ऑपरेशन्ससह बायनरी ट्री, ऑर्डर, प्रीऑर्डर आणि पोस्ट ऑर्डर, बँक मॅनेजमेंट प्रोजेक्ट फ्लोचार्टने काही पायऱ्या समजावून सांगितल्या. विद्यार्थ्यांनी काढलेल्या प्रकल्पाचा फ्लो चार्ट आदी प्रकार' सांगून त्यांनी सी या भाषेचे महत्व पटवून सांगितले. शेवटच्या दिवशी विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादरीकरण केले. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली. या कार्यशाळेत इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागाच्या द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी विभागातील डॉ.एन.पी. कुलकर्णी, प्रा.आर.बी.पवार यांच्यासह इतर प्राध्यापकांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा.एस.एस.खोमणे यांनी केले तर विभागप्रमुख डॉ. मिनाक्षी पवार यांनी आभार मानले.

# तालुका मंडणगड येथील पालवणी गावात दोन दिवसीय महापुरुषांच्या संयुक्त जयंतीचे आयोजन

**रत्नागिरी / दैनिक यशसिध्दि न्यूज**

बौध्द समाज सेवा संघ,शाखा क्र.१ ग्रामिण ,बौध्द विकास मंडळ- विभाग मुंबई, उत्कर्ष महिला मंडळ आणि यंग सिध्दार्थ मित्र मंडळ पालवणी यांच्या संयुक्त विद्यमाने जेतवन बुध्द विहार, मुक्काम पोस्ट पालवणी , तालुका मंडणगड , जिल्हा रत्नागिरी येथे तथागत भगवान गौतम बुध्द यांची २५६८ वी जयंती तसेच विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती महोत्सवाचे सोमवार दिनांक १३ मे २०२४ आणि मंगळवार १४ मे २०२४ रोजी संयुक्तपणे साजरा करण्याचे आयोजिले आहे.यावेळी सोमवारी १३ मे २०२४ रोजी काशिनाथ पवार यांच्या अध्यक्षतेखाली धम्म ध्वजा रोहण होणार असून यावेळी तथागत गौतम बुध्द आणि डॉ. बाबासाहेब आंबेडर यांच्या प्रतिमांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून भन्ते आयुपाल यांच्या हस्ते दोन्ही प्रतिमांची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे.यावेळी विविध क्रीडा स्पर्धा त्यानंतर शैक्षणिक, सेवा निवृत्त , देणगीदार यांचा बक्षीस आणि सत्कार समारंभ होवून शेवटी मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम होतील. या संपुर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रविण पवार आणि मनोहर पवार हे करणार आहेत.दुसऱ्या दिवशी १४ मे २०२४ रोजी सतिष पवार यांच्या अध्यक्षतेखाली धम्म वंदना घेण्यात येईल. यावेळी बौध्दचार्य अशोक पवार यांचे धार्मिक प्रवचन होईल. त्यानंतर नियोजित विविध कार्यक्रम होतील.सायंकाळी जाहीर सभेचे अयोजन करण्यात आले असून स्नेह भोजन होणार आहे. शेवटी कव्वाली हा प्रबोधनाचा कार्यक्रम होऊन या दोन दिवशीय जयंती महोत्सवाची सांगता होणार आहे. असे प्रकाश पवार यांनी एका पत्रकाद्वारे कळवण्यात आले आहे.

# पुरंदर मध्ये नवीन मतदार व समान नावाचे मतदार मतदानापासून वंचित

**पुरंदर/दैनिक यश सिध्दि न्यूज**

पुरंदर मधील बोपगाव या ठिकाणी नवीन तरुण मतदार ते वृद्ध मतदार यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला व एकूण ६५.७३% मतदान झाले.सकाळी सात ते सायंकाळी सहा पर्यंत कडक उन्हाळा जाणवत असतानाही मतदारांनी आपला हक्क बजावला.परंतु काही नवीन मतदारांना मतदानापासून वंचित




राहावे लागेल नोंद केली असतानाही यादीमध्ये नावाचा समाविष्ट झाला नाही त्यामुळे त्यांना मतदानापासून वंचित राहावे लागले तसेच समान नावांचा फार गोंधळ उडाला उदा सुमित दत्तात्रय फडतरे,संतोष दशरथ फडतरे, राणी संभाजी फडतरे, कोमल राहुल फडतरे,अनिकेत दत्तात्रय फडतरे अशी डबल नावे मतदार यादी मध्ये असून या नावाच्या दोन व्यक्ती गावांमध्ये आहेत त्यामुळे फार गोंधळ उडाला, काहींना नाव असूनही मतदानाला वंचित राहावे लागले,काहींची नावे वगळण्यात आलेले आहेत. यासाठी मतदारांनी आणि शासकीय काम करणाऱ्या अधिकारी,कर्मचारी वर्गांनी याच्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन निवडणुकीच्या अगोदर या सर्व चूक दुरुस्त्या कराव्या तरच मतदारांना आपला हक्क व्यवस्थित बजवता येईल.

# माजी खासदार रवींद्र गायकवाड यांच्या विरोधात मुस्लिम समाज आक्रमक



**कळंब/प्रतिनिधी**

कळंब लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी असून उस्मानाबाद धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे घड्याळ चिन्ह घेऊन उभा असलेले अजित पवार गटाचे उमेदवार अर्चनाताई पाटील यांच्या प्रचारार्थ एका सभेमध्ये माजी खासदार रवींद्र गायकवाड यांनी मुस्लिम समाजाच्या भावना दुखवतील व जाती धर्मात तेढ निर्माण होईल असे वक्तव्य केले आहे. तसेच त्या वक्तव्यामुळे जाती धर्माच्या नावावर मते मागता येत नाहीत याची पूर्ण कल्पना असताना देखील जाणून-बुजून धर्माच्या नावाने मते मागण्याचे काम प्रा.रवींद्र गायकवाड यांनी घड्याळ चिन्हाकरिता केलेलं आहे. जे की आदर्श आचार संहिताचे उल्लंघन आहे, तरी त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी सकल मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली, यावेळी शहरातील मुस्लिम समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# नळदुर्ग शहरात महाराणा प्रताप यांची जयंती उत्साहात साजरी



**नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे:**

महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० रोजी कुंभलगड येथे झाला १९ जानेवारी १५९७ रोजी महाराणा प्रताप सिंहासनावर आरुढ झाले महाराणा प्रताप यांनी मुघलाचे अधिपत्य मान्य केले आणि आयुष्यभर त्यांच्या विरुद्ध विशेषतः म्हणजे अकबराशी लढा उभा केला आशा राष्ट्रप्रेम सर्वधर्म समभाव, सहिष्णता , करुणा , स्वतंत्र्याचे युद्ध , धोरणात्मक आदर्शाचे पालन , मानवी हक्काचे रक्षण , महिलांचा आदर करत पर्यावरण आणि जनसंवर्धन सर्वसामान्य साहित्याचा आदर ठेवणे हे महाराणा प्रताप यांच्या कार्याचे प्रमुख वैशिष्ट्ये होती. समता आणि समानता प्रस्थापित करण्यासाठी सतत प्रयत्नशील आसणाऱ्या माहारणा प्रताप यांची जयंती खूप मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन नळदुर्ग येथील ज्येष्ठ पत्रकार विलास येडगे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी माजी नगरसेवक बसवराज आप्पा धरणे माजी नगरसेवक विनायक अहंकारी ,माजी नगरसेवक सुधीर हजारे , नळदुर्ग शिवसेना प्रमुख संतोष पुदाले पत्रकार उत्तम बनजगोळे सामाजिक कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव , पत्रकार दादासाहेब बनसोडे , युवकांचे प्रेरणास्थान मंडळाचे यूवक अध्यक्ष मनोज हजारे , यूवकांचे नेतृत्व पपू पाटील , राहुल हजारे सागर हजारे , अतुल हजारे , शुभम हजारे , अक्षय हजारे , सनी हजारे , शुभम हजारे , सर्व नागरीक उपस्थितानी पुष्प अर्पण करून अभिवादन केले . महाराणा प्रताप की जय म्हणून गगण भेदी घोषणा देण्यात आला .